# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

ePaper नवराष्ट्र Paschim Maharashtra | 09 October 2025 | Page 1

# पाटणमध्ये आज विविध विकासकामांचे उद्घाटन

▶ पाटण येथील कोयना शिक्षण संस्थेच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालयात विविध नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. या अनुषंगाने उभारण्यात आलेल्या नवीन अद्ययावत संगणक प्रयोगशाळा आणि विस्तारित इमारतीचे उद्घाटन गुरुवारी (दि. ९) दुपारी २.३० वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार अतुल भोसले, पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी दिली.

## मंत्री चंद्रकांत पाटील यांची उपस्थिती

पाटण तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये मिळणाऱ्या उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या दूरदृष्टीकोनातून विविध नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. यामध्ये बी. कॉम. आय.टी., बीसीए, बी. एससी.(कंप्युटर सायन्स-इंटायर), एम. कॉम. आय.टी., एमकेसीएल, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र यांचा समावेश आहे. उद्घाटनप्रसंगी संस्थेचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण यांची उपस्थिती राहणार आहे.